# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १६/०८/२०२४ (शुक्रवार) सायंकाळ**

---

## अवैधरीत्या विदेशी दारूची वाहतूक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध कारवाई

दि. १४/०८/२०२४ रोजी पोस्टे नरखेड येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असता गोपनीय माहिती मिळाली की, PHC रोड नरखेड येथे मोटरसायकल क्र. एम.एच–४०/बि. एस–१८४३ ने दारूची अवैध वाहतुक होत आहे. अशा माहितीवरून मोटरसायकल क्र. एम.एच–४०/बि. एस–१८४३ ने अवैद्यरीत्या दारू वाहतूक करणाऱ्या दोन इसमांना नाकाबंदी केली असता **आरोपी नामे– १) आकाश उर्फ गोल्डी रवी सोमकुवर, वय ३० वर्ष, रा. वार्ड क्रमांक ५ नरखेड २) शुभम अशोकराव नारनवरे, वय २७ वर्ष, रा. वार्ड क्रमांक ११ नरखेड** हे जयस्तंभ चौक कडून पी एस सी रोडकडे एका काळया रंगाचे स्प्लेंडर मोटरसायकल क्र. एम.एच–४०/बि.एस–१८४३ वर निळा व भुरकट रंगाचे पाठीवरील बॅगमध्ये १८० ml क्षमतेच्या Royal challange कंपनीच्या १० निपा प्रत्येकी १९० रुपये प्रमाणे किंमती १९००/– रुपयाचा मुद्देमाल, officer choice कंपनीच्या १० निपा प्रत्येकी १५० रुपये प्रमाणे किंमती १५००/– रुपयाचा मुद्देमाल, व मोटरसायकल क्रमांक एम.एच–४०/बि. एस–१८४३ किंमती २००००/– रुपये असा एकूण २३४००/– रुपयाचा मुद्देमाल विदेशी दारू बाळगून मिळून आल्याने सदर आरोपीविरुद्ध कलम ६५(ई), ६५(अ) महाराष्ट्र दारूबंदी कायदयानुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे मा. पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार, मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे नरखेड येथील ठाणेदार सपोनि अजित कदम, मपोहवा मनिषा सावरकर, पोअं. हरीनारायण चव्हान, केवल आडे यांनी पार पाडली.

## अवैधरीत्या धारदार व घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

दिनांक १५/०८/२०२४ रोजी पोस्टे भिवापूर येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असता मिळालेल्या माहितीच्या आधारे गुजरी चौक भिवापूर येथे **आरोपी नामे– शाहरूख बसीर शेख, वय २५ वर्ष, २) संजय गोपाल खडसे, वय २५ वर्ष, दोन्ही रा. सिद्धार्थ नगर भिवापूर** यांनी भिवापुर येथील गुजरी वार्डात तलवार काढली असुन तलवार हातात घेवुन हातवारे करूण लोकांमध्ये भिती निर्माण केली आहे. अशा मिळालेल्या माहिती वरून फिर्यादी आपल्या स्टाफसह गुजरी चौक भिवापूर परीसरात जावून **आरोपी नामे– शाहरूख बसीर शेख, वय २५ वर्ष, २) संजय गोपाल खडसे, वय २५ वर्ष, दोन्ही रा. सिद्धार्थ नगर भिवापूर** यांना ताब्यात घेतले. आरोपींकडुन त्यांचेकडे असलेली तलवार जप्त करण्यात आलेली आहे. आरोपीतांविरूद्ध कलम ४, २५ भारतीय हत्यार कायदा सहकलम १३५ मपोका. अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे मा. पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार, मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे भिवापूर येथील ठाणेदार सपोनि जयप्रकाश निर्मल, पोहवा आनंद धात्रक, पो.अं. मनोज चाचेरे यांनी पार पाडली.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**